**L. A. BILL No. LII OF 2023.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.**

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९६१ चा महा. २७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २८-१अअ मधील,— १९६१ चा महा. २७.

(१) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३-१अ) या कलमात व कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-एक भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना, वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-एक भोगवट्यावर देण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील ;

(ब) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी, जर अशा जमिनींना लागू असलेले संबंधित अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये असे रूपांतरण करण्याची तरतूद असेल तर, उक्त अधिनियम व नियम यांच्या तरतुदींनुसार वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरित करता येतील.";

(२) पोट-कलम (३अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल : —

"(३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाद्वारे निर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, त्याने निश्चित केलेल्या दरांत, शासकीय किंवा निमशासकीय संस्थांना अथवा महानगरपालिकेला, नगरपरिषदेला, नगर पंचायतीला किंवा ग्राम पंचायतीला सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याकरिता विल्हेवाट करता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(अ) (एक) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केलेल्या परिषदेच्या किंवा नगर पंचायतीच्या नगरपालिका क्षेत्रापासून ; १९६५ चा महा. ४०.

(दोन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रापासून ; किंवा १९४९ चा ५९.

(तीन) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून, १९६६ चा महा. ४१.

पाच किलोमीटरच्या परिसरात स्थित असलेल्या शैक्षणिक, वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण किंवा सांस्कृतिक प्रयोजनांसाठी ; किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेत नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ; किंवा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये समाविष्ट असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठी ; आणि १९६६ चा महा. ३७. २०१३ चा १३.

(ब) या प्रयोजनासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या सार्वजनिक प्रकल्पातील प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी,

जमिनीची विल्हेवाट लावणे, असा आहे.".

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (३) मध्ये,—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९ ची सुधारणा.

(एक) पहिल्या परंतुकामधील, " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी रक्कम " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेच्या वास्तव बाजारमूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ याच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पंचाहत्तर टक्के इतकी रक्कम ";

(दोन) दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ मध्ये नवीन कलम २९अ समाविष्ट करणे.

" **२९अ.** कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, कलम २७ अन्वये वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनींचे,—

कलम २७ अन्वये दिलेल्या जमिनीच्या भोगवट्याचे रूपांतरण.

(एक) अशी जमीन दिल्याच्या तारखेपासून दहा वर्षे उलटल्यानंतर ; आणि

(दोन) जर अशी जमीन देण्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले नसेल तर ; किंवा जर अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले असेल तर, असे उल्लंघन नियमाधीन केल्यानंतर,

विहित करण्यात येईल अशा रूपांतरण अधिमूल्याचे प्रदान केल्यावर आणि अशा कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर आणि अशा इतर अटी व शर्तींना अधीन राहून, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करू शकेल.".

**५.** मुख्य अधिनियमाचे कलम ४०अ वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ४०अ वगळणे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(इ-१) कलम २९अ अन्वये वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनींचे, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रुपांतरण करण्याचे रूपांतरण अधिमूल्य, त्याची कार्यपद्धती आणि त्याच्या इतर अटी व शर्ती ;".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**७.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात शेतजमिनीच्या धारणेवर उच्चतम मर्यादा (किंवा कमाल मर्यादा) घालण्यासाठी आणि अशा कमाल मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात धारण केलेल्या जमिनीचे संपादन करण्याकरिता व तिचे वितरण करण्याकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २७) अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम २१ अन्वये अतिरिक्त म्हणून घोषित केलेल्या जमिनी, त्याच्या कलम २७ अन्वये वर्ग-दोन भोगवट्यावर भूमिहीनांना, माजी सैनिकांना व इतरांना वाटप करण्यात आलेल्या आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम २९ अन्वये जिल्हाधिका-याच्या पूर्वमंजुरीने आणि विहित केलेले अधिमूल्य प्रदान केल्यावर, अशा अतिरिक्त जमिनींचे हस्तांतरण किंवा विभाजन करण्यास मुभा देण्यात आलेली आहे. जिल्हाधिका-याच्या पूर्वमंजुरीशिवाय आणि त्यासाठीचे अधिमूल्य प्रदान न करता केलेले अशा जमिनींचे हस्तांतरण किंवा विभाजन, अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतके अधिमूल्य प्रदान केल्यानंतर, नियमाधीन करण्याची तरतूद देखील २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ अधिनियमित करून शासनाने केलेली आहे.

कलम २७ अन्वये दिलेल्या जमिनींमध्ये, तसेच ज्यांनी आपल्या जमिनी औद्योगिक उपक्रमांना पट्ट्याने दिलेल्या होत्या, अशा भूतपूर्व पट्टाकारांना (खंडक-यांना) किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना कलम २८- १अअ (३) अन्वये परत दिलेल्या जमिनींमध्ये, हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून, अशा जमिनींच्या भोगवट्याचे वर्ग-दोन मधून वर्ग-एक मध्ये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम २९अ अन्वये शासनाच्या जमिनींच्या भोगवट्याचे वर्ग-दोन भोगवट्यामधून वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करण्याच्या धर्तीवर, रूपांतरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मागण्या करण्यात येत आहेत. म्हणून, उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचे शासनाने ठरविले आहे.

**३.** उक्त अधिनियमाच्या सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये, पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) कलम २७ अन्वये दिलेल्या अतिरिक्त जमिनींच्या भोगवट्याचे, अधिमुल्याचे प्रदान केल्यावर व विवक्षित अटी व शर्तींना अधीन राहून, वर्ग-दोनमधून वर्ग - एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करणे ;

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम २८-१अअ च्या पोट-कलम (३) अन्वये भूतपूर्व पट्टाकारांना (खंडक-यांना) किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना पुन्हा देण्यात आलेल्या जमिनींच्या भोगवट्याचे,-

(एक) जेव्हा भूतपूर्व पट्टाकाराने (खंडक-याने) औद्योगिक उपक्रमास दिलेली जमीन ही, वर्ग-एक भोगवट्याची जमीन असेल त्या बाबतीत, कोणतेही अधिमूल्य न आकारता ; आणि

(दोन) जेव्हा भूतपूर्व पट्टाकाराने (खंडक-याने) औद्योगिक उपक्रमास दिलेली जमीन, वर्ग-दोन भोगवट्याची जमीन असेल त्या बाबतीत, जर अशा जमिनीस लागू असलेला संबंधित अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यामध्ये, असे रूपांतरण करण्याची तरतूद असेल तर, संबंधित अधिनियमाच्या तरतुदींनुसार,

रूपांतरण करणे ;

(क) जी जमीन, कलम २९ चे उल्लंघन करून हस्तांतरित केली होती किंवा विभाजन केली होती अशी जमीन नियमाधीन करण्याकरिता, अधिमूल्याची रक्कम, अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांवरून पंचाहत्तर टक्के इतकी वाढविणे ;

(ड) गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून पाच किलोमीटरच्या परिसरात स्थित असलेल्या महामंडळाकडे निहित असलेल्या जमिनीची, सार्वजनिक प्रयोजनांसाठी विल्हेवाट लावण्याचा अधिकार शासनास प्रदान करणे ;

(इ) किरकोळ उल्लंघनांसाठी राज्य अधिनियमांच्या तरतुदींचे निर्गुन्हेगारीकरण करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विवरणे सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षेची तरतूद असलेले कलम ४०अ वगळणे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ११ डिसेंबर, २०२३.

**राधाकृष्ण विखे-पाटील,**
महसूल मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ४.-** या खंडान्वये, कलम २९अ अन्वये वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनींचे वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करण्याचे रूपांतरण अधिमूल्य, त्याची कार्यपद्धती आणि अटी व शर्ती नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७.-** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी, आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २७) यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

सदर विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीमधून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाच्या अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ पुर:स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

## सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यातील उतारे)

## (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७)

**१.** ते **२८-१-अ.** * * *

**२८-१-अ अ.** (१) ते (३) * * * राज्य महामंडळांना जमीन देण्याचा राज्य शासनाचा अधिकार

(३-अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबतीत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाला विर्निर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर व शर्तीवर, सार्वजनिक प्रयोजनासाठी, विल्हेवाट करता येईल " आणि जेव्हा अशी विल्हेवाट शासकीय अथवा निमशासकीय संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांना करण्यात येईल तेव्हा ती मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये करण्यात आलेल्या मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ अनुसार ठरविण्यात आलेल्या बाजारमूल्यानुसार अथवा जाहीर लिलावाने करण्यात येईल."

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता " सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे " या शब्दप्रयोगाचा अर्थ, शैक्षणिक, वैद्यकीय किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था किंवा समाजकल्याण आणि सांस्कृतिक कार्य संस्था याच्या करिता सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेमध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा भूमि संपादन अधिनियम, १९८४ याच्या कलम ३ च्या खंड (फ) मध्ये समावेश असलेल्या, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या नगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या परिसरात असलेल्या, मुंबई प्रांतिक महानगरापालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम (२) च्या खंड (१०) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रातील इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा या प्रयोजनार्थ शासनाने अधिसूचित केलेल्या सार्वजनिक प्रकल्पातील व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी जमिनीची विल्हेवाट करणे, असा आहे.

(४) * * *

**२९.** (१) व (२) * * * कलम २८ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीचे हस्तांतरण किंवा विभागणी करण्यावर निर्बंध.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) चे उल्लंघन करून केलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण किंवा कोणतीही विभागणी आणि अशी जमीन संपादन करणे या गोष्टी अवैध ठरतील आणि त्याबद्दल शास्ती म्हणून अशा जमिनीतील किंवा जमिनीच्या संबंधातील हस्तांतरकर्ता किंवा हस्तांतरिती याचा कोणताही हक्क आणि हितसंबंध, अशा व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यावर, जिल्हाधिका-याकडून सरकारजमा करण्यात येईल आणि आणखी हस्तांतरणाशिवाय ती राज्य शासनाकडे निहित होईल.

परंतु, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभानंतर, जर हस्तांतरकर्ता, हस्तांतरिती किंवा अशा जमिनीत हितसंबंधित असलेली इतर कोणतीही व्यक्ती ही, महाराष्ट्र शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी रक्कम प्रदान करील तर, पोट-कलम (१) च्या किंवा, यथास्थिती, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल जिल्हाधिकारी अशी कोणतीही जमीन सरकारजमा करणार नाही :

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकान्वये राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट केलेली रक्कम ही, महाराष्ट्र मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरवणे) नियम, १९९५ याच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार अशा जमिनीच्या निश्चित केलेल्या बाजार मूल्याच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.''

(४) पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकामध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेचे प्रदान केल्यावर,—

(एक) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या उल्लंघनाकरिता आणखी कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही ;

(दोन) महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर कार्यवाही आधीच सुरू करण्यात आलेली असेल तर, अशी कार्यवाही रद्दबातल होईल आणि जिल्हाधिकारी तशा आशयाचा आदेश काढील.

**३०.** ते **४०.** * * *

विवरण इत्यादी सादर करण्यात कसूर केल्यास शिक्षा.

**४०अ.** (१) कलम १२ अन्वये आवश्यक ठरविलेले विवरण देण्यास जी जबाबदार आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती, त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत ते विवरण सादर करण्यात कसूर करील किंवा जे खोटे असल्याचे तिला माहीत असेल किंवा जे खोटे आहे असे तिला सकारण वाटत असेल असे विवरण पुरवील त्या व्यक्तीला कलम १३ मध्ये विहित केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त, दोषसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतींच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची, कोणतेही न्यायालय, जिल्हाधिका-यांच्या पूर्वमंजुरीशिवाय दखल घेणार नाही, अशी मंजुरी, विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, देण्यात येईल.

**४१.** ते **४५अ.** * * *

नियम करण्याचा अधिकार.

**४६.** (१) * * *

(२) (अ) ते (ड) * * *

(ई) कलम २९ अन्वये ज्या परिस्थितीत व ज्या शर्तीस अधिन राहून मंजुरी देता येईल ती परिस्थिती व त्या शर्ती ;

(३) * * *

**४७.** ते **४९.** * * *

**अनुसूची.** * * *

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.]**

**[महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,**
महसूल मंत्री.**)**

**श्री. जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर